प्रेसनोट ता.२३/०२/२०१९

चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन ने फ्लिपकार्ट आणि ॲमेझॉन कंपनीस गंडा घालणाया सराईत इसमास पकडून त्याचेकडून पुणे,नागपुर,औरंगाबाद व अमरावती येथील एकूण ०४ गुन्हे उघडकीस आणून – ४,२१,३५०/-कि.रू चा मुद्देमाल हस्तगत केला.

---

चतुःश्रृंगी पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये दिनांक १९/०२/२०१९ रोजी पेट्रोलिंग करीत असताना पोलीस शिपाई ज्ञानेश्वर मुळे यांना बातमी मिळाली की,इसम नामे अमोल तांगडे हा चोरीचे मोबाईल मोबाईल विक्रीसाठी दसरा चौक येथे आला असल्याची खात्रीशीर माहिती मिळालेनंतर सदर महिती मा.अप्पर पोलीस आयुक्त श्री सुनिल फुलारी पुर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर,मा.पोलीस उप आयुक्त,श्री डॉ.प्रसाद अक्कानवरू,परिमंडळ ४ पुणे शहर,मा.सहा.पोलीस आयुक्त,श्री कल्याणराव विधाते, खडकी विभाग पुणे शहर यांना देवून त्यांनी केलेल्या सुचना प्रमाणे भास्कर जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्रीमती वैशाली गलांडे पोलीस निरीक्षक गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक श्री संदेश केंजळे,पोलीस उप निरीक्षक प्रेम वाघमोरे,कर्मचारी पो.हवा. बाळासाहेब गायकवाड,पो.हवा.एकनाथ जोशी,पोलीस हवा. आबा गुंड,पो.ना.सारस साळवी,पोना प्रकाश आव्हाड,पोना दादासो काळे,संतोष जाधव व पो.शि.तेजस चोपडे, ज्ञानेश्वर मुळे,पो.ना.संजय वाघ,तसेच परिमंडळ ४ मधील कर्मचारी विकास शिंदे,यांचे टिम ने इसम नामे अमोल परमानंद तांगडे,वय २२ वर्षे रा.सध्या- राजाराम किवळेनगर, प्लॉट नं.६१,रेल्वे लाईन जवळ,रावेत,जि.पुणे.मुळगांव - मु.पो.माळखेड,ता.मेहकर,जि.बुलढाणा.यास दसरा चौक येथे त्याचेकडून चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन कडील ०१ गुन्हा,घाडगेनगर पो.स्टे.अमरावती कडील ०१ गुन्हा,सिडको पो.स्टे. औरंगाबाद कडील ०१ गुन्हा व सोनेगांव पो.स्टे.नागपुर शहर कडील ०१ गुन्हा असे एकूण ०४ गुन्हे उघडकीस आले असून सदर गुन्हयामध्ये एकूण ४,२१,३५०/-कि. रू चे एकूण ०६ आयफोन ७ प्लस,एक डेल कंपनीचा लॅपटॉप, एक रियल कंपनीचा मोबाईल व एक रेडमी कंपनीचा मोबाईल तसेच चोरीची बजाज पल्सर हस्तगत आली आहे. अधिक तपास पोलीस उप निरीक्षक प्रेम वाघमोरे हे करीत आहेत.

(भास्कर जाधव )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
चतुःश्रृंगी पो.स्टे.पुणे शहर